बृहन्मुंबई दूध योजनेमार्फत आरे शक्ती गाय दूध (३.८ फॅट व ८.५ एसएनएफ) खरेदी - विक्री करण्यास मान्यता ...

**महाराष्ट्र शासन**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

**शासन निर्णय क्रमांकः एमएलके २०१३ /प्र.क्र. ९८/ पदुम ८**

मंत्रालय विस्तार, मुंबई ४०००३२

तारीख: १५ ऑक्टोबर, २०१६

**वाचा :**

१) आयुक्त दुग्धव्यवसाय यांचे पत्र क्र. आदुवि-२१/दूध संकलन/वितरणवाढ उपाययोजना(बिझनेस प्लॅन)/२०१६, दि.६.१०.२०१६

२) दि.१०.१०.२०१६ रोजीच्या प्रदत्त समितीच्या बैठकीचे इतिवृत्त

३) शासन समक्रमांक दि.१५.१०.२०१६

**प्रस्तावना :**

बृहन्मुंबई दूध योजनेतील वितरणात वाढ करणेसाठी तसेच मुंबई येथे दूध आणण्यासाठी होत असलेल्या वाहतूकीच्या खर्चात कपात करण्याच्या दृष्टीने मुंबई जवळील नाशिक व पुणे विभागातील सहकारी दूध संघांकडून बृहन्मुंबई दूध योजनेसाठी स्थळ पोहोच दूध खरेदी केलेल्या दुधाची विक्री करण्यास शासनाने संदर्भ क्र.३ अन्वये मान्यता दिली आहे. आता दि.१०.१०.२०१६ रोजीच्या प्रदत्त समितीच्या बैठकीत मान्य झाल्यानुसार सदर दुधाकरीता विक्री दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

शासन या निर्णयान्वये बृहन्मुंबई दूध योजनेमार्फत विक्री करण्यात येणाऱ्या ३.८ /८.५ या गुणप्रतीच्या "आरे शक्ती गाय दूध" या दुधाची, १ लिटर पिशवीबंद दुधासाठी रु.४१/- प्र.लि. व १/२ लिटर पिशवीबंद दुधासाठी रु.२१/- (म्हणजेच प्रति लिटर रु.४२/-) या दराने विक्री करण्यास शासन मान्यता देत आहे.

हे आदेश प्रदत्त समितीच्या दिनांक १०.१०.२०१६ रोजीच्या बैठकीत शिफारस केल्यानुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६१०१५१५०१४३४००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra Vasantrao Gurav

Digitally signed by Ravindra Vasantrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d[illegible] 3d93c38d6e222c868eac72ecd12784, cn=Ravindra Vasantrao Gurav
Date: 2016.10.15 15:05:17 +05'30'

(र.व.गुरव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव

२) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव